ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र. ३३

सरकारी अधिकाऱ्यांच्या मूल्यांबद्दल फार बोलले जाते, फार कुतूहल असते. याबद्दल मोकळेपणाने बोलणे पण फार उचित मानले जात नाही. माझ्या अनुभवावरून मी या संवेदनशील विषयावर काही मांडू इच्छितो. तुम्ही साधनशुचिता पाळू शकता की नाही हा फार वैयक्तिक प्रश्न आहे. वैयक्तिक अनुभवावरून मला वाटते प्रामाणिक रहाणे नक्की जमू शकते. मात्र प्रामाणिक रहायचं की नाही ही आपली व्यक्तिगत निवड असते. तुम्ही अप्रामाणिक असू नये हे चांगलेच पण त्याच बरोबर प्रामाणिकपणाचा अहंकार देखील असू नये. प्रामाणिकपणाचा अहंकार हा फारच धोकादायक असतो. तुमच्या गरजा कमी असतील तर तुम्हाला काही वेगळे करायची आवश्यकता नसते. विशेषत: सहाव्या वेतन आयोगानंतर पगार खूप झाले आहेत. तुमच्या गरजा कमी असतील तर या पगारात मजेत राहता येते. माझ्या IRS तुकडीत १२० जणांमध्येही, किंबहुना ज्या-ज्या सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध आले, त्यात अत्यंत निरलस आणि निस्पृह अधिकारी होतेच. Henry Thoreau ने म्हणल्या प्रमाणे "if one is not in step with his companions, it is perhaps because he hears a different drummer'. असे वेगळे आवाज ऐकू येणारे खूप समविचारी भेटले. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि मूल्यसंस्कार हे सर्वत्र मिळू शकतात. सरकारी नोकरीत दिलेले काम करताना भ्रष्टाचार करणे हा माझ्या दृष्टीने व्यभिचार आहे. प्रलोभने असतानाही अनेकांनी मूल्यांशी तडजोड न करता काम करून दाखवले आहे. प्रबोधिनीत ही मूल्यं शिकायला मिळतात यात शंकाच नाही पण फक्त प्रबोधिनीतच शिकायला मिळतात असेही नव्हे.

राजीव रानडे

(१९६९-१९७६)

## १९६९ ते २०२१ – एक दीर्घ नाते

मी १९६९ ते १९७६ या कालावधीमध्ये प्रबोधिनीत विद्यार्थी होतो. आमची पाचवीची पहिली तुकडी. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सकाळी आणि संध्याकाळी आमचे वर्ग भरायचे. १९७६ ते १९८३ मी बीएससी–एमएससी केले आणि १९८३ ते १९८८ प्रबोधिनीमध्ये अध्यापन करत होतो. १९८८ ते ९० मस्कतमध्ये इंडियन सेंट्रल स्कूलमध्ये दोन वर्षं अध्यापन केले. १९९०मध्ये मी UPSC परीक्षा १३४ व्या रँकने उत्तीर्ण होऊन १९९१साली Indian Revenue Service (IRS) मध्ये दाखल झालो. जुलै २०२०मध्ये आयकर आयुक्त (अपील) या पदावरून मी निवृत्त झालो. १९६९साली पाचवीत प्रबोधिनीत घेतलेल्या प्रवेशापासून २०२०मध्ये निवृत्ती पर्यंतच्या वाटचालीत, गाण्यामध्ये तंबोरा जसा सदैव पार्श्वभूमीवर भरून राहिलेला असतो, तसेच प्रबोधिनीचे अस्तित्व भरून राहिलेले आहे यात कुठलीच शंका नाही.

मी प्रबोधिनीच्या अगदी जवळ पेरूगेट जवळ राहत असे. आमचे, दिवसरात्र प्रबोधिनीत असल्याने, प्रबोधिनी हेच विश्व होते. घरच्यांना इतकी खात्री होती की मुलगा घरात नाही म्हणजे प्रबोधिनीत असणार. प्रबोधिनीत शिकल्याने आणि शिकवल्याने प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धती व्यतिरिक्त कुठली पद्धत मस्कतला जाईपर्यंत माहीत नव्हती. दुसऱ्या एखाद्या शाळेत काय असते याची मुळीच कल्पना नव्हती. मस्कतला गेल्यावर मला जाणवले की सगळ्या शाळांमधून शिक्षणाचे खूप वेगवेगळे प्रयोग केले जातात. आपल्याकडे प्रबोधिनीत थोड्या जास्त प्रमाणात प्रयोग होतात, इतर शाळांत ते प्रमाण कमी असले तरी शिक्षणातले चांगले प्रयोग तिथेही होत असतात. तिथेही चांगले प्रयत्न करणारे, कष्ट करणारे कल्पक शिक्षक असतात. सर्वात महत्त्वाचा फरक म्हणजे सामाजिक बांधिलकीचा आग्रह जितक्या मोठ्या प्रमाणावर प्रबोधिनीमध्ये धरला जातो तितका इतर ठिकाणी जाणीवपूर्वक केलेला आढळत नाही. श्रीमद शंकराचार्यांनी 'मा गृध कस्यस्विद धनम्' यावर भाष्य करताना 'परस्य ईव स्वस्य वा', फक्त दुसऱ्याच्या नाही तर स्वत:च्या धनावरही वासना जाऊ देऊ नकोस हे सांगितले आहे. प्रबोधिनीत हे फार आग्रहाने मांडले जाते. त्यामुळे आपल्या क्षमतांचा वापर समाजऋण फेडण्यासाठी केलाच पाहिजे हे सूत्र सर्वांच्या मनात झिरपत असतेच असते. हे प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

प्रबोधिनीमध्ये हुशार मुले निवडून घेतात हे फक्त ऐकलेले होते. १०वी पर्यन्त आपण हुशार आहोत याची शंकाही कधी आली नव्हती. आमच्या वर्गात नेहमी अजित, मिलिंद, प्रफुल्ल, अतुल, देवदत्त वगैरे बक्षिस मिळवणारे होते आणि आम्ही कायम टाळ्या वाजवणारे होतो. एकदाच फक्त दहावी–अकरावीमध्ये कधीतरी वाटले की पुस्तक उघडून पहावे म्हणून रसायनशास्त्र वाचले आणि ते आवडले म्हणून पुढे त्यातच एमएससी पर्यन्त शिक्षण घेतले. मला NTS शिष्यवृत्ती मिळाल्याने आयआयटी कडे न वळता बीएससी–एमएससी केले. १९८३साली मी PhD करणार होतो तेव्हा वामनराव आणि यशवंतरावांनी विचारले की




प्रशालेत अध्यापन करायला येशील का? मी हो म्हणालो आणि PhD सोडून प्रबोधिनीत आलो. शिक्षण क्षेत्रातच काम करायचे म्हणून B.Ed आणि M.Ed देखील केले. प्रबोधिनीतील अध्यापक म्हणून १९८३ ते १९८८ ही पाच वर्षं माझ्या आयुष्यातील अतिशय उत्तम अशी आहेत. प्रबोधिनीमध्ये शिकवणे म्हणजे शिक्षकासाठी असिधाराव्रत असते. कारण कोण तुमची विकेट कुठला प्रश्न टाकून कधी घेईल हे सांगता येत नाही. सुदैवाने विकेट न पडता शाबूत राहू शकलो. या पाच वर्षांत मी जे कमवले त्याचा प्रचंड फायदा मला मस्कतमध्ये आणि National Academy Of Direct Taxes (NADT), Nagpur मध्ये अतिरिक्त महासंचालक म्हणून काम करताना झाला यात शंकाच नाही. ही प्रक्रिया खूप सहज झाली. मी सहनिवासावर रहायचो, शाळेत मुलांना शिकवायचो आणि त्याच मुलांबरोबर दलावर खेळायचो त्यामुळे मी कायम मुलांसाठी सहज उपलब्ध असायचो. मला दादा किंवा राव कोणी म्हणायचे नाही तर सरळ राजू नावाने हाक मारायचे, इतके अनौपचारिक शिक्षण चालायचे. या अनौपचारिक पद्धतीचा NADT मध्येही तेवढाच फायदा झाला.

## विद्यार्थी – शिक्षक – कार्यकर्ता म्हणजेच अधिमित्र

माझे १८ वर्षे आयुष्य विद्यार्थी आणि शिक्षक कार्यकर्ता असे प्रबोधिनीत गेले. त्यामुळे सांगण्यासारख्या खूप आठवणी आहेत. 'ते सरता संपत नाही चांदणे त्या स्मरणांचे' अशी माझी अनेकांसारखी अवस्था आहेच. आमच्या आधी मोहनरावांच्या तुकडीने आणि संजय सावंतांच्या तुकडीने कबड्डी अजिंक्यपद जिंकले होते. आमच्या वर्गात आबा हसबनीस आणि मिलिंद मोडक असे चांगले खेळाडू असूनही निसटत्या फरकाने आम्ही हरलो. त्यावेळेला मिलिंदचा पायाचा अंगठा फ्रॅक्चर झालेला

असूनही तो फायनल खेळला. आम्ही परांडे वाड्यात जाऊन सगळे रडत बसलो होतो तेव्हा आप्पांनी आमची समजूत घातली. अकरावीच्या वेळी आम्ही रात्री अभ्यासाला आणि झोपायला प्रबोधिनीत असायचो. रात्री वर्ग धुणे हा आवडीचा कार्यक्रम असायचा. आमच्या अनेक सहली व्हायच्या, पद्यगायन व्हायचे. पद्यगायन हा अंगावर रोमांच आणणारा प्रकार होता. रामभाऊ, अशोकराव, शरदराव, विसूभाऊ हे आमचे हिरो !

आम्ही खूप प्रकल्प करायचो. मी शाळेत असतानाही मी अनेक प्रकल्प केले. त्यात आम्ही नीलाताईंबरोबर दोन महिने खूप मेहनत करून एक इंटरकॉम सर्किट बनवले, पण ते चालेना. बटन दाबले की फक्त कुऽऽऽ असा आवाज येत असे. मी, विजय इनामदार आणि महेश बापये असे तिघे जण होतो. परीक्षण करायला अध्यापक आणि परीक्षक आले तेव्हा त्यांनी ते बटन दाबले आणि कुऽऽऽ असा आवाज आल्यावर त्यांनी चकित होऊन विचारले की हे काय आहे? तेव्हा आम्ही सांगितले की हा इंटरकॉम आहे. त्यांनी विचारले, हा आवाज कसला? तेव्हा अंतर कमी असल्याने आवाज होतो हे ठणकावून सांगितले. दुसऱ्या गटाने ट्रॅफिक लाईटस असा काहीतरी सिलेक्टर स्विच वगैरे आणून जबरदस्त प्रकल्प केला होता. दोघांनाही दुसरा क्रमांक आणि विभागून पारितोषिक मिळाले.



**मा. पी. व्ही. नरसिंहराव शिक्षण मंत्री असताना प्रबोधिनी भेटीदरम्यान संगणकावर गीत वाजवून दाखवताना**

आम्ही १०वीमध्ये असताना तुळशीच्या पानानी पेट्रोल consumption कमी होते असा एक प्रकल्प नलूताईंनी माझ्याकडून करून घेतला होता. त्याच्या प्रदर्शनात शंतनुराव किर्लोस्कर आले होते. त्यांना तो फार आवडला होता. त्यांनी दहा मिनिटे माझ्या खांद्यावर हात ठेवत समोर उभे राहून आमचा प्रकल्प समजून घेतला होता.

आमच्या वर्गात २३ जण होते. अजूनही सर्वजण संपर्कात आहेत. अनेकांनी त्यांच्या व्यावसायिक क्षेत्रात अप्रतिम यश मिळवले आहे. जनरल मनोज नरवणे सेनाप्रमुख झाला आहे. डॉ. मिलिंद दीनानाथचा संस्थापक सदस्य आहे. आबा, नंदू, शैलेश, कर्नल तर अजित कानिटकर फोर्डमध्ये उच्च पदावर महेश, अतुल आयटी मध्ये देवदत्त IIM मध्ये विक्रम आणि प्रफुल्ल डॉक्टर्स .. अजून आमची मैत्री घट्ट टिकून आहे. आमची मैत्री पुढच्या पिढीत पण संक्रमित झाली आहे याचा आनंद आहे.

अकरावी झाल्यावर मी महात्मा फुले दलाचा प्रतोद होतो. मी चांगला फुटबॉल खेळतो असा शोध मला आणि इतरांनाही लागला. दलावर आम्ही फुटबॉल खेळायचो. विकु ही फार चांगला फुटबॉल खेळायचा. आमची दोघांची जोडी छान जमायची. युवक विभागात असताना मी, विजय भांबुरकर, प्रदीप परांजपे, मनोज देवळेकर, अजित कानिटकर व इतर अनेक अशा सर्वांनी मिळून फटाके विक्रीचे सर्व गणित उभे केले. शारीरिक श्रमाची परिसीमा असायची. दसऱ्यापासून आम्ही तयारी करायचो. त्या सर्व नियोजनातून मोहनरावांकडून फार शिकायला मिळाले. मोहनराव एक अप्रतिम आयोजक आहेत. आम्ही त्यांच्या हाताखाली काम करून घडलो. दिवसभर, २४ तास तुम्ही फटाके विक्री स्टॉलवर उभे राहिलात की तुमच्या शारीरिक श्रमाची, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता वाढते. पत्र्याचा स्टॉल दुपारी भयानक तापायचा आणि रात्री प्रचंड गार पडायचा. आम्ही अनेकदा झोप आली की फटाक्याच्या पेट्यांवर स्टॉलखाली झोपत असू. फटाके विक्रीचे दिवस म्हणजे धुंद करून सोडणारे होते, त्या सगळ्या कामाची एक विलक्षण वेगळीच नशा होती.

गणेशोत्सवात मी आणि मंगेशनी ध्वज नाचवायच्या नवीन स्टेप्स बसवल्या होत्या. आप्पांनी अगदी पाठ थोपटून कौतुक केल्याची धुंदी अजून उतरायची आहे.

याच काळातील अजून एक आठवण म्हणजे करंजावणे येथील साखर कारखान्याचे काम सुरू होते. एका रात्री आप्पांनी मला गुळाच्या भावासंदर्भात एक चिठ्ठी दिली आणि सांगितले की ही चिठ्ठी स्कूटरने जाऊन करंजावणेच्या कारखान्यावर जाऊन आण्णांकडे नेऊन दे, आणि त्यांचे उत्तर घेऊन पहाटे पाच पर्यंत परत ये. माझ्याकडे बजाज स्कूटर होती तिचा दिवा लागेना, कुत्री मागे लागली असे करत-करत मी पोचलो. आण्णांना उठवले आणि त्यांचे उत्तर घेऊन सहा वाजेपर्यंत पुण्यात आलो. दुसऱ्या दिवशी रविवार होता त्यामुळे थोडा वेळ घालवला मग न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर जाऊन दलावर व्हॉलीबॉल खेळलो आणि मग घरी जाऊन झोपलो.

मला १९८३साली मला विचारले, की शिकविण्यासाठी नागालँडमध्ये जाणार का? त्यावेळी मी जातो म्हणालो. नागालँडमध्ये भय्याजी काणे संचालित पूर्वांचल प्रतिष्ठानच्या शाळा चालू होत्या. त्यांना विज्ञान शिक्षक हवा होता. मला पुण्यातून बसने बंगलोरला पाठवले. तेव्हा माझ्या भूगोलाच्या ज्ञानानुसार नक्की कसा प्रवास होणार हेच मला समजेना. बंगलोरला भय्याजी काणे भेटले आणि ते म्हणाले रात्री आपल्याला मद्रासला जायचे आहे. मद्रासहून आम्ही ईस्ट कोस्ट

एक्सप्रेस पकडून कोलकात्याला गेलो. तिथून विमान पकडून दिमापूर आणि पुढे सहा तास प्रवास करून इजालूकि, पेरेन नावाच्या गावी गेलो. तीन महीने मी तिथेच त्या गावात रहात होतो. आमच्या विद्यार्थ्यांमध्ये दोन विद्यार्थी बर्मा बॉर्डरजवळ रहायचे. तिथपर्यंत पायी प्रवास करून आम्ही त्यांच्या घरी जाऊन आलो होतो.

अजून एक आठवण म्हणजे म्हैसाळला विठ्ठल सहकारी सोसायटीमध्ये तिथल्या कार्यकर्त्यांचे शिबिर घ्यायला भाई फडके, प्रमोद सडोलीकर आणि मी गेलो होतो. पुढच्या वर्षी एकटाच गेलो होतो. त्याचे दादा (मधुकरराव) देवलांना फार कौतुक वाटले होते.

खूप ट्रेक केले. काही झालं की उठलो आणि गडावर जाऊन आलो, त्याची गणतीच नाही. अनेक ट्रेक स्वतः नेले. राजमाचीला किती वेळा गेलो असेन हे पन्नासच्या नंतर मोजणे सोडून दिले. एकदा आप्पांनी सांगितलं की महाबळेश्वर ते सज्जनगड चालत जा. मग नकाशावर पट्टी ठेऊन वाट शोधत गेलो. असे अनेक डोंगर पालथे घातले. उल्हास नदीच्या उगमाचा शोध, कर्जत ते लोणावळा असा ट्रेक यशवंत चव्हाणच्या बॅच बरोबर केला. भाई, विकू आणि मी होतो. आम्ही एका रात्री पावसात अडकलो होतो. पुण्यात वेळेत परतलो नाही म्हणून तिकडे सगळी धावपळ, फोनाफोनी सुरू झाली होती. लोणावळ्याच्या इथे कसेबसे वर आलो. तसाच एक ट्रेक पक्का आठवतो, तो म्हणजे भीमाशंकर ते राजमाची असा ट्रेक होता. ढाक चा भैरी केला आणि समोर राजमाची दिसला. वाट सोडून कुठेतरी खुळ्यासारखी चढायला सुरुवात केली आणि अडकलो की!! आणि दुसऱ्या दिवशी कसेबसे वर चढलो, त्यात सुभाष कुंटे खाली पडला. एक हाड मोडलं पण सुदैवाने तो एका झाडाला सॅक अडकल्याने अडला. मग त्याला वर चढवून लोणावळा पर्यन्त डोलीमध्ये काही गावकऱ्यांच्या मदतीने घेऊन आलो. सायकल ने तोरण्यापर्यंत जाणे, गड चढणे, आणि त्याच दिवशी परत येणे असले काहीच्या काही उद्योगही आम्ही केलेले आहेत.

**घडविता घडविता घडवावे**

८३ ते ८८ मी प्रशालेमध्ये रसायनशास्त्र हा विषय शिकवत होतो. मी प्रशालेत NTS चे वर्ग सुरू केले. ही स्पर्धा परीक्षा केंद्राची सुरुवात !! पहिल्याच वर्षी पालकसभेत मी सांगितले होते, की आपले सात जण NTS मध्ये निवडले जातील. तेव्हा वामनरावांनी म्हटले की अहो असं थेट जाहीर सांगायचं नसतं. तेव्हा मी म्हटलं होतं सात मुले येणार आणि आपली सात मुले निवडली देखील गेली.



**१९८६ साली MTS मिळवलेले माझे विद्यार्थी**

त्याच्या पुढच्या वर्षी २५जण MTS ला (पहिल्या १०मध्ये सहा जण) आणि नऊ जण NTS ला निवडले गेले. कर्नल दिवाण यांचे त्यावेळी पुण्यात क्लास चालायचे त्यांच्यासाठी हा फार मोठा धक्का होता. आम्ही बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेच्या तयारीसाठी मुलांनाच प्रश्न बनवून आणायला सांगायचो. उदाहरणार्थ एखादा क्यूब उघडला की कसा दिसेल त्याच्या सहा आकृती पाहून प्रश्न तयार करून आणायचे. त्यावेळी गोव्याचे शिक्षण संचालक वा. ना. दांडेकर होते ते या सर्व प्रयोगांवर प्रचंड खुश झाले. प्रबोधिनीमध्ये किंवा कुठेही शिकवताना विद्यार्थ्यांशी संवाद आणि संपर्क ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. तुमचा त्यांच्याशी वैयक्तिक संवाद आणि संपर्क असेल तर मुलं फार चांगल्या पद्धतीने प्रतिसाद देतात.

**संपर्क, संवाद आणि पाठीवर थाप**

मी प्रबोधिनीचाच भाग असल्याने माझ्याकडे स्वत:च्या वेगळ्या अशा भूमिकाच नव्हत्या. मी शिकवायला लागलो याचे उद्दिष्ट म्हणजे नवीन प्रबोधक घडवणे आणि त्यांचे प्रबोधिनीशी नाते टिकवून ठेवणे हेच होते. त्यामध्ये मी फक्त एक catalyst आहे अशीच माझी भूमिका होती. सहली, शिबिरे, प्रकल्प हे विद्यार्थी म्हणून केलेले असल्याने त्यात शिक्षक म्हणून फार वेगळा विचार करून काहीतरी करावे अशी गरज न पडता ती एक सहज प्रक्रिया झाली. आम्ही मुलांना tall order प्रोजेक्ट द्यायचो. म्हणेज त्यांनी प्रकल्प करायचे आणि त्याचा रिपोर्ट बनवायचा व त्यावर पंधरा मिनिटे सेमिनार द्यायचा. दहावीमध्ये असताना मंगेश चिंचाळकर इन्फ्रारेड स्पेक्टरोस्कोपीबद्दल बोलला होता, मल्हार पालकर सिंथेसिस ऑफ कोलेस्ट्रॉल विषयावर बोलला होता, अखिल सिग्मा पाय बॉंडिंग बद्दल बोलला. BSc मधील मुले सुध्दा ज्या विषयावर बोलायला घाबरायची त्या विषयांवर मुले शाळेत बोलायची. त्यांना किती कळले याला फार महत्त्व न देता तुम्ही मुलांना जितके अवघड विषय द्याल तितकी त्यांची भीती जाते आणि ते फुलत जातात. संवाद आणि संपर्कासोबत appreciation तिसरी महत्त्वाची गोष्ट असते. एक शिक्षक म्हणून तुम्ही मुलांची छोट्यात छोटी गोष्ट appreciate करता की नाही याला फार महत्त्व असते आणि ते मी करू शकलो. नेहमीच्या वर्गात जे चमकतात त्या मुलांकडे सगळे लक्ष देत असतात कारण ती मुले तुम्हाला result देणारी असतात.

मुलगा हुशार आहे म्हटल्यावर तुम्ही त्याला शिकवले नाही तरी तो चांगले गुण मिळवणार आहेच. माझ्यासाठी ६५ टक्क्यांपासून ७५ पर्यंत येणारा मुलगा हा ९० पासून ९२ टक्क्यांपर्यंत येणाऱ्या मुलापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. हे करायला काय करावे लागेल? मुलांमध्ये असलेली अज्ञात स्फूर्ती केंद्र शोधणे हेच शिक्षकाचे खरे काम आहे. मुलांना खूप न्यूनगंड असतात. आम्हीही नेहमी पहायचो आणि स्वतःला म्हणायचो की आपल्याला मिलिंद सारखे येत नाही, अजित सारखे येत नाही. पण मग कधीतरी प्रबोधिनीत कुणीतरी यायचे आणि म्हणायचे की तुला पण जमेल. मग त्याच क्षणी तो बदलाचा एक क्षण तुमच्या आयुष्यात येतो. शिक्षकांची मुलांमध्ये असलेली गुंतवणूक किती आहे हे महत्त्वाचे असते. असे प्रेरणा देणारे शिक्षक प्रबोधिनीत मिळाले. ज्यांचा परफॉर्मन्स क्षमतेपेक्षा कमी आहे तो अधिक चांगला कसा होईल, पूर्ण क्षमतेइतका कसा होईल यासाठी जीव ओतणारे शिक्षक मिळाले. मी पण तसे व्हायचा प्रयत्न केला.

## मस्कतमधील दोन वर्षे व थेट UPSC परीक्षा

१९८८ ते ९० मी मस्कतमध्ये इंडियन सेंट्रल स्कूलमध्ये होतो. मस्कतमध्ये भारतातील सर्वच मुलांना इंडियन सेंट्रल स्कूलमध्ये प्रवेश घेता यायचा. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वैविध्य होते. मला सलग दोन वर्षे 'सर्वोत्तम शिक्षक' म्हणून मतदानातून निवडले गेले. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जी मुले अभ्यासात कमी होती त्यांच्याकडे दिलेले लक्ष. ती खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, इतर उपक्रमात चमकायला लागली. वर्गात जी सर्वात दंगेखोर आणि बंडखोर मुले होती त्यांनाच आम्ही विद्यार्थी प्रतिनिधी आणि वर्गप्रतिनिधी केले. त्यांनी उत्तम प्रकारे काम केले आणि त्याचे सर्वांना आश्चर्य वाटले. मला पुरस्कारावेळी बोलायला सांगितले की या बदलाचे रहस्य काय? आणि त्याचे एकच रहस्य आहे ते म्हणजे प्रेम. The only secret of transformation is love and trust . मी या सगळ्यातून शिकलो की तुम्ही मुलांना नियमातून सूट न देताही शिक्षा टाळून मुलांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवू शकता. तुम्ही सर्वांना सारखे नियम लावता हे सर्वांना लक्षात आले की त्यांना तुमच्याशी काही अडचण नसते. कुठल्याही स्तरावर मुलांच्या आत्मविश्वासाला खतपाणी घालणे हे शिक्षकाचे महत्त्वाचे काम आहे. प्रबोधीनीतून हे शिक्षण माझ्यामध्ये नकळत आले. मी शिक्षक आणि युवक कार्यकर्ताही असल्याने मला मुलांच्यात आत्मविश्वास रुजवणे सोपे गेले.

शिक्षण क्षेत्रात आता कंटाळा आला आहे अशी भावना १९९०साली माझ्या मनात आली. अध्यापन हे काही माझे पोट भरण्याचे साधन म्हणून मी पाहत नव्हतो किंवा मला माझे स्वत:चे शिकवणी वर्ग देखील सुरू करायचे नव्हते. UPSC द्यावी अशी इच्छा मनात कधीतरी होती. अविनाश धर्माधिकारी, मकरंद आडकर, प्रदीप कुलकर्णी असे आमचे खूप मित्र UPSC करत होते. १९९०ला व्ही. पी. सिंग यांनी पात्रता वय वर्ष वाढवून ३० केले. त्यावेळी माझे वय ३० वर्ष होते. UPSC ला बसायचे म्हणून राजीनामा दिला. मी नोकरी सोडून दिल्यावर मस्कतच्या शाळेत हलकल्लोळ झाला. They did not want to lose a good teacher. मी नोकरी का सोडली तर मला UPSC द्यायची होती. आज मागे वळून पाहताना मला हा मूर्खपणा वाटतो. It was a very brave but foolish decision. UPSC अशी परीक्षा आहे की ज्यामध्ये भले-भले लोक चीत होतात आणि परीक्षेबद्दल काही अंदाज बांधले जाऊ शकत नाहीत. माझे वय ३० असल्याने माझ्या हातात एकमेव प्रयत्न शिल्लक होता. माझ्या मनात त्यावेळी फक्त परीक्षा द्यायचे आणि कितवी रँक आली हे पहायचे इतकेच होते. त्यावर्षी मी सोळा-सोळा तास सलग अभ्यास करायचो. मराठी हा विषय optional म्हणून घेतला होता. रात्री अगदी आमच्या घरातील कुत्र्याला मर्ढेकरांच्या कविता ऐकवायचो. मी, अतुलचंद्र कुलकर्णी (IPS), सदानंद दाते (IPS), वामन पारखी (IRS GST), विवेक फणसळकर (IPS), विवेक वाडेकर अशा सर्व लोकांनी एकत्र अभ्यास केला. सगळे जण आदल्या वर्षी पास झाले होते. या वर्षी मी एकटाच त्यात तरून गेलो आणि सिलेक्ट झालो. आश्चर्यकारकरित्या १३४ वी रँक आली पण मला चष्म्याचा नंबर जास्त असल्याने IPS मिळाले नाही. वडील म्हणले Income Tax घे म्हणून मी Income Tax मध्ये गेलो. पहिले ट्रेनिंग हैद्राबादला होते, नागपुरला फाऊंडेशन कोर्स आणि भावनगरला पोस्टिंग झाले. बडोदा-पुणे-कोल्हापूर-पुणे, नागपूर-राजकोट-नागपूर-औरंगाबाद-पुणे असा माझा ३० वर्षे प्रवास झाला.

## शासकीय सेवेतील तीस वर्षे

वयाची दहा ते सत्तावीस अशी सतरा वर्षे प्रबोधिनीतच गेली तेव्हा एकच ध्यास होता की प्रबोधिनीचा कार्यकर्ता म्हणून काम करायचे. मी चांगला संवाद साधू शकतो हे माहीत असल्याने शिक्षण क्षेत्रात काम करायचे असे ठरत गेले आणि होत गेले. IRS मधील प्रवास ठरलेला असतो आणि त्यात मला डिपार्टमेंटमध्ये विविध चांगली कामे करता आली. स्पर्धात्मक राहून आणि चांगले काम करत अभिमानास्पद रीतीने मी २९ वर्षे काम केले. तुम्ही जिथे-जिथे जाता तिथे पोचायच्या आधीच तुमच्या बद्दलची सगळी माहिती पोचलेली असते. माझी एक उत्तम सरकारी अधिकारी म्हणून ओळख असावी अशी दाट

शक्यता आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या मूल्यांबद्दल फार बोलले जाते, फार कुतूहल असते. याबद्दल मोकळेपणाने बोलणे पण फार उचित मानले जात नाही. माझ्या अनुभवावरून मी या संवेदनशील विषयावर काही मांडू इच्छितो. तुम्ही साधनशुचिता पाळू शकता की नाही हा फार वैयक्तिक प्रश्न आहे. वैयक्तिक अनुभवावरून मला वाटते प्रामाणिक रहाणे नक्की जमू शकते. मात्र प्रामाणिक रहायचं की नाही ही आपली व्यक्तिगत निवड असते. तुम्ही अप्रामाणिक असू नये हे चांगलेच पण त्याच बरोबर प्रामाणिकपणाचा अहंकार देखील असू नये. प्रामाणिकपणाचा अहंकार हा फारच धोकादायक असतो. तुमच्या गरजा कमी असतील तर तुम्हाला काही वेगळे करायची आवश्यकता नसते. विशेषत: सहाव्या वेतन आयोगानंतर पगार खूप झाले आहेत. तुमच्या गरजा कमी असतील तर या पगारात मजेत राहता येते. मी ही मूल्यं प्रबोधिनीत शिकलो पण माझ्या IRS तुकडीत १२० जणांमध्येही, किंबहुना ज्या-ज्या सरकारी अधिकाऱ्यांशी संबंध आले, त्यात अत्यंत निरलस आणि निस्पृह अधिकारी होतेच. Henry Thoreau ने म्हणल्या प्रमाणे "if one is not in step with his companions, it is perhaps because he hears a different drummer'. असे वेगळे आवाज ऐकू येणारे खूप समविचारी भेटले. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि मूल्यसंस्कार हे सर्वत्र मिळू शकतात. सरकारी नोकरीत दिलेले काम करताना भ्रष्टाचार करणे हा माझ्या दृष्टीने व्यभिचार आहे. प्रलोभने असतानाही अनेकांनी मूल्यांशी तडजोड न करता काम करून दाखवले आहे. माझ्या घरच्यांनी फार अपेक्षा केल्या नाहीत. वडील, बायको, मुलगा यांनी पाठींबा दिला आणि कसलेही हट्ट धरले नाहीत. आम्ही समाधानाने जगत आहोत. माझ्या कारकिर्दीत मोहाचे मोजता येणार नाहीत इतके क्षण आले पण ते नाकारायला फार धैर्य लागते असे नाही, किंवा फार काही विशेष आहे असे मला वाटत नाही. It is a personal choice based on your value systems. प्रामाणिक राहणे हे काही फार मोठे आव्हान नाही आणि मी एकटाच आहे असेही नाही. त्याचा अभिनिवेश नसला पाहिजे हे महत्त्वाचे. मला रात्री झोप व्यवस्थित लागते. पण सिस्टिमची गंमत अशी आहे की तुमचा बॉस अप्रामाणिक असेल तर तो तुम्ही प्रामाणिक असलात तरी तुमची झोप उडवू शकतो. मला सुदैवाने सगळे चांगले बॉस मिळाले. आमच्याकडे कुठली केस असली आणि मी ऐकले नाही की त्यातले काही लोक थेट सीनियर ऑफिसरला 'देख लेना, उसको जरा समझाओ' अशा सूचना पाठवायचे. माझे वरिष्ठ त्यांच्याच स्तरावर 'राजीव के पास केस है तो तुम छोड दो, वो सुनेगा नही, तुम ट्रीब्युनल जाने की तयारी शुरू कर दो' असे सांगायचे. प्रामाणिकपणा ही वैयक्तिक निवड आहे. प्रबोधिनीत असल्याने त्यापलीकडे काही असते हे माहीतच नव्हते. पण फक्त प्रबोधिनीतील लोकच प्रामाणिक असतात असेही नाही. प्रबोधिनीत ही मूल्यं शिकायला मिळतात यात शंकाच नाही पण फक्त प्रबोधिनीतच शिकायला मिळतात असेही नव्हे.

प्रोफेशनल करियरमध्ये मला कधीच सेटबॅक आले नाहीत. माझे पहिलेच पोस्टिंग भावनगरला झाले. त्यावेळी मला पहिल्यांदा शोधायला लागले की भावनगर आहे कुठे? सरकारने ठरवले की तुम्हाला तिथे जाऊन ठरलेल्या नियमाप्रमाणे काम करावे लागते. त्यामध्ये येणाऱ्या बदल्या हे जीवनाचे भाग असतात. तुम्ही जर तुमच्या बदल्या आनंदाने स्वीकारल्या तर तुमचे भारतभर संपर्क तयार होतात. भारत काय आहे हे समजण्यासाठी बदली सारखे दुसरे साधन नाही. तुम्ही फिरायला जाऊन देश समजून घेऊ शकत नाही तर तुम्हाला त्यासाठी तिथे प्रत्यक्ष काम करायला लागले. मी भावनगरला आणि राजकोटला राहिलो तेव्हा मला गुजराती संस्कृती काय हे सजमले, विविधतेत एकता आणि विविध संस्कृती या गोष्टी पर्यटन करून किंवा त्या प्रदेशातील मित्र घरी बोलावून समजत नाही. त्या-त्या प्रदेशाचे सांस्कृतिक आचार तुम्हाला प्रत्यक्ष तिथे काम केल्यावर लक्षात येतो. तुम्हाला जिथे जायला सांगतात तिथे तुम्ही आवडीने गेलात तर तुम्ही हे जाणून घेऊ शकता. मी स्लिप ला की बाउंडरीला फिल्डिंग करायची की सिली पॉइंटला उभे रहायचे हे कर्णधार ठरवतो, आपण निष्ठेने ते ऐकायचे ही भूमिका असली की फार मजा येते. If you accept and like your job in toto then you can do wonders in that job. मी विरोध न करता जिथे पाठवतील तिथे काम करत गेलो आणि मी माझ्या कामाबद्दल खूप समाधानी आहे.

**राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी (National Academy of Direct Taxes)**

UPSC उत्तीर्ण झालेल्या सर्व भावी अधिकाऱ्यांचे सुरुवातीचे पायाभूत प्रशिक्षण (foundation course) मसुरी येथे असते. त्यानंतर मात्र अतिशय सखोल व दीर्घ प्रशिक्षण त्या-त्या सेवेनुसार विकेंद्रित पद्धतीने होते. जसे सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे हैद्राबाद येथे, Indian Revenue Services मधील सर्व प्रशिक्षणार्थी NADT मध्ये येतात. २०११-१२ मध्ये मी NADT मध्ये Additional Director म्हणून दाखल झालो. त्यानंतर २०१७ ते १९ ADJ म्हणून दाखल झालो. एकूण साडेचार वर्षे राष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षण संस्थेमध्ये काम करायची संधी मिळाली. These are golden years of my life. NADT मध्ये मी ६५ IRS Batch च्या १२५ ऑफिसर्सच्या Induction Training कोर्सचा CD (Course









myself presenting the batch profile to the Hon'ble president. What more could one ask for ?




director) होतो. मी तिथे मित्र, गाईड, अधिमित्र, मोठा भाऊ असे विविध रोल करत होतो. The job was to ensure seamless integration of these officers in IRS. I think I did a splendid job and I am very proud that my boys and girls are doing stupendous job as officers in the field. The highest cash seizure in the country so far is by Sankarganesh, my proabtioner. प्रत्येक वर्षी संपूर्ण IRS cader मधून एकच In Course Director असतो. १२० अतिशय क्षमतावान आणि गुणवान प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांमध्ये काही गुणवत्ता वाढ करू शकलो हे विलक्षण समाधानकारक आहे. I think I've made investment for next thirty years. कुठल्याही अलंकारात सोन्याचा वाटा असतो तसा सोनाराचाही असतो की. त्यानंतर २०१७-१९ मध्ये Additional Directorate General - NADT झाल्यावर तीन बॅच माझ्या हाताखालून गेल्या. प्रबोधिनीत मी जे शिकवले त्याचा फायदा मला UPSC आणि नंतर NADT च्या कामात झाला असे मला वाटते. NADT मध्ये माझ्याकडे शंभर-सव्वाशे प्रशिक्षक अधिकारी असतात. संपूर्ण भारताचे चित्र त्यामध्ये दिसते. UPSC उत्तीर्ण होऊन आलेली असल्याने सर्वच मुले चांगल्या बुद्धिमत्तेची असतात. मात्र प्रत्येकाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक पार्श्वभूमी वेगवेगळी असते. त्या सगळ्यांची एकत्र मोट बांधून त्यांना Income Tax सारखा विषय शिकवायचा हे एक मोठे आव्हान असते आणि ते मी यशस्वीपणे पेलले. You trust people and invest in them असे माझे सूत्र होते. स्टीफन कोवेचे एक वाक्य आहे - "It is always better to trust people and be proved wrong sometimes than to always mistrust people and be proved right sometimes.' हे माझे सूत्र होते. कुणी व्यक्ती बंडखोर असणे आणि वाईट असणे यात फरक असतो. शिक्षक म्हणून तुम्हाला ते ओळखावे लागते. Who is genuinely bad and who is genuinely rebellious हे तुम्हाला समजावे लागते. Rebellious व्यक्तीला दिशा देता येऊ शकते. कुणी extraordinary bad नसतेच असा माझा अनुभव आहे. तुम्ही विश्वास आणि प्रेमाने माणसे आपलीशी केली पाहिजे. हे मला प्रबोधिनी, मस्कत, NADT सगळीकडे जमले असे नक्कीच वाटते. निश्चितच त्याचे समाधान आहे.

The one thing I'm really proud of is the starting of one week army attachment for IRS, starting 65th batch of IRS.. Our proabtioners went and stayed with the jawans on LOC, at high altitude camps, in J&K, Arunachal, Sikkim and had first hand exposure to army values and ethos which resulted in tremendous value addtion to my officer trainees. I went upto Bumla pass (from where the chinese had entered in 1962), 15000 ft with one group. It was so exciting. GOC, Srinagar had allotted only 15 min. for my OTs curtsy visit. He was so thrilled with the questions that the interaction went on for 2 hrs. This important initiative has continued since then. Generally such attachment is there for IAS, IPS, IRS (CCE). That I could get this inculcated as a part of IRS induction training was very satisfying. There was a visible change in the IRS OTs, thus reinforcing my belief that one year military attachment should be made mandatory for all youth in this country.




यशस्वी, प्रभावी शिक्षक होणे अतिशय अवघड काम आहे. यासाठी काही कौशल्ये लागतात. एक म्हणजे तुम्ही चांगले listner असायला पाहिजे. प्रतिक्रिया न देता आणि मनात पूर्वग्रह न ठेवता तुम्ही ऐकू शकलात तर अर्ध्याहून जास्त प्रश्न पहिल्या ऐकण्यातच संपतात. आपल्या शिक्षण पद्धतीत जर तुम्ही 'मी सांगतो ना, खाली बस!' असे वागत असाल तर परिवर्तन शक्य नाही. सगळीकडे श्रोतेपण कमी पडते ते आपण वाढवले पाहिजे. The basic illusion about communication is that it has taken place असे जे शॉ ने म्हणले आहे ते सदैव लक्षात ठेवायलाच पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी सगळ्यांना सांगायचो आणि माझ्या इथे लिहून ठेवले होते, की There is nothing so simple that cannot go wrong. हे भान असले तर चुका कमी होतात.

Traditional training philosophy states that training is to develop knowledge, skill and attitude. We rephrased it as 3C principle in NADT. पहिलं म्हणजे CHARACTER. दुसरे म्हणजे COMPETENCE आणि तिसरे म्हणजे COMMITMENT. These are the most desired and essential attributes of one's personality that need to be developed through training. प्रबोधिनी काय, NADT काय, एक महत्त्वाची गोष्ट पक्की झाली ती म्हणजे Everybody is fond of positive strokes. मी अधिकाऱ्यांना नेहमी सांगायचो की तुम्ही जेव्हा फील्डवर जाता तेव्हा तुम्हाला कुणाचे कौतुक करायचे असेल तर तुम्ही ते सर्वांसमोर करा आणि तुम्हाला कुणाला झापायचे असेल तर एकट्याला खोलीत बोलावून सांगा. तुम्ही सगळ्यांसमोर एखाद्याचा अपमान केला तर त्याच्या स्वत:बद्दलच्या संकल्पनेला धक्का बसतो. तुम्ही विश्वास, प्रेम आणि ऐकून घेण्याची क्षमता बाळगली तर चमत्कार वाटेल अशी कामे करून घेऊ शकता. Its a great feeling to see people trasform from a caterpillar to a butterfly.

आमच्या कामात लोकांशी थेट संवाद तसा कमी असतो. अधिकारी म्हणून लोक तुम्हाला बाहेर देखील ओळखत असतात. There is a very thin line between being friends and being acquaintances. One has to be very careful not to cross the line.

विशेषत: आमच्या कामात अधिकाऱ्याशी ओळख असणे ही काम करवून घेण्याची किंवा काम न करवून घेण्याची एक मोठी strategy असू शकते याचे भान ठेवायला लागते. आमच्यासमोर बर्याचदा CA येतात, प्रत्यक्ष Assessee येत नाहीत. CA ला त्याची केस जिंकणे हेच जीवन-मृत्यू सारखे असते त्यामुळे तो सगळे प्रकार वापरतो. त्याला लक्षात आले की एखाद्या साहेबाला स्तुती आवडते तर तो तेच करतो. "Casius said ceaser does not like to be praised and ceaser was happy' ही त्यांची सर्वात उपयोगी पडणारी स्ट्रॅटेजी असते. तुम्हाला या सगळ्या पलीकडे जाऊन निरक्षिरविवेक करायची हातोटी साधायला लागते.

डिपार्टमेंटमध्ये assessment, investigation आणि administration अशा प्रकारचे मुख्य काम असते. मी assessment मध्ये खूप वर्षं काम केले. काही वर्षं investigation मध्ये काम केले आणि पाच वर्षं ट्रेनिंगमध्ये काम केले. अनेक चांगले अधिकारी असतात त्यांची भूमिका Not a penny less and not a penny more अशी असते. तुमची जेवढी legitimate tax liability आहे तेवढीच मी घेणार ही मानसिकता फार महत्त्वाची असते. अहंकाराचा वारा न लागो राजसा हे पदोपदी बजवायला लागते.

छापा टाकणे किंवा रेडच्या बाबतीत तसे थोडे ग्लॅमर आहे. त्याचे फार विलक्षण अनुभव आहेत पण ते सार्वजनिकरित्या मांडता येऊ शकत नाही. अनेक प्रसंग असे आहेत की ज्यामध्ये दृष्टीकोन बदलले. कितीही ग्लॅमरस असले तरी तुम्ही कुणाच्या तरी घरी जाता तेव्हा तुम्ही संविधानाने दिलेल्या एका अमर्यादित अधिकाराची अंमलबजावणी करत असता, त्यामुळे तो अतिशय जाणीवपूर्वक वापरावा लागतो. घरोघरी गेल्यानंतर त्या घरातील प्रमुखाचा घरात मान असतो आणि त्याला कुणीतरी 'आप इधर बैठो, आपका स्टेटमेंट चल रहा है' असे सांगितले जाते, फोन काढून घेतले जातात अशा सर्व गोष्टी असल्याने त्याच्या घरातील प्रतिमेला फार मोठा धक्का बसतो. त्यासाठी आणि घरच्यांसाठी हा त्रासदायक अनुभव असतो. It not at all a easy thing. लोकांना मानसिक धक्का असतो. आयकर अधिकारी आले, आपला पैसा जाईल, इज्जत जाईल याने मानसिक धक्के बसतात. अनेक वेळेला कौटुंबिक रहस्य समोर येतात, की जी त्या व्यक्तीने कुटुंबापासून लपवलेली असतात त्याची भीती असते. हे सर्व करताना आमच्या बरोबर फक्त दोन पोलिस असतात. आम्ही ज्यावेळी रेडला जातो तेव्हा आम्हाला सर्वाधिक धोका असतो, we're very vulnerable. पण ज्यांनी दहा-वीस वर्षं पैसे बुडवून व्यवस्था निर्माण करून साम्राज्य निर्माण केलेले असते त्यांच्याकडे आमचे अधिकारी जाऊन दोन-तीन दिवसात ते शोधून १००, २००, ५००, हजार कोटीची करचुकवेगीरी शोधून काढतात हे अत्यंत समाधानकारक असते. त्यामुळे RAID चित्रपटाचे वाक्य फार खरं आहे. "Heroes are not always men in uniform.'

दुसरा फार महत्त्वाचा भाग त्यात असतो तो म्हणजे आमचा स्टाफ. त्यांची कामावरची निष्ठा आणि कामातली मानसिक गुंतवणूक ही विलक्षण असते. आमची रेड ७२/९६ तास चालली तर सर्वांना तिथेच थांबावे लागते. या सगळ्यांचे वय जास्त असते, पगार कमी असतात आणि त्यांना सहज प्रलोभने दाखवली जाऊ शकतात. मात्र तरी देखील ते अत्यंत निष्ठेने त्यांचे काम करतात. भारतात असे जे आपले दिलेले काम निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करत असतात, त्यांच्या आधारावर आपला देश खरा आज टिकून आहे. There is some ray of hope somewhere because of these people. आमची रेड असली तर आम्हाला रात्री भावनगरहून राजकोटला घेऊन जायचे आणि मग तीन दिवस काम चालायचे. आमचा सपोर्टिंग स्टाफ निष्ठेने काम करतो म्हणून सर्व शक्य होऊ शकते. त्यांना सलाम करायला हवा.

आपल्या समाजाचे moral fiber कसे आहे हे आयकर विभागात गेल्याशिवाय कधीच कळत नाहीत. अनेक लोक हे सामाजिक आयुष्यात मोठ्या पदावर आणि प्रतिष्ठित असतात, अनेक सार्वजनिक संस्थाचे अध्यक्ष आणि पदाधिकारी असतात. समजाच्या नैतिकतेच्या मापदंडावर ते अतिशय चांगले असतात मात्र ते कर चुकवतात. मला वाईट याचे वाटते की समाजामध्ये अत्यंत मान, प्रतिष्ठा असणारी माणसे कर चुकवतात, किंबहुना त्याबद्दल कुठलीच बोच त्यांच्या मनात नसते. आणि हीच माणसे तुमच्या मुलांना येऊन साधनशुचितेचा उपदेश देत असतील तर हे बादलीत बसून-बसून बादली उचलण्यासारखे आहे. कर बुडवण्याची मानसिकता हा आपल्या देशासमोरचा एक गंभीर प्रश्न आहे. समाजाला लागलेला मोठा शाप आहे. दुख: एवढेच की याला समाज मान्यता आहे.

गेल्या दहा वर्षांत तीन लाख कोटी वरुन बारा लाख कोटी पर्यन्त प्रत्यक्ष करसंकलन वाढलेले आहे. IRS मध्ये Enforcer to Facilitator असा एक बदल भूमिकेत होत आहे. समाजातील लोकांचा डिपार्टमेंटमधील लोकांशी असणारा संपर्क कमी कसा होईल हे पाहिले जात आहे. Public Interface कमी करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे भ्रष्टाचार कमी होऊ शकेल. सरकारने आता Faceless assessment अशी योजना आणली आहे. कुणाची केस कोण तपासेल असा अंदाज त्यामुळे लावता येणार नाही. आता सगळे refunds ऑनलाइन जातात त्यामुळे ज्या कामाला आधी एक-दोन वर्षं लागायची ती आता दोन महिन्यात होतात. तंत्रज्ञानामुळे नक्कीच फायदे झाले आहेत. त्यामुळे लोकांचा डिपार्टमेंटवर विश्वास वाढतो आणि विश्वास वाढला की voluntary compliances वाढतात आणि त्यातून कर भरण्याचे प्रमाण वाढते आहे. आम्ही तुमचे राजे नाही तर मित्र, मार्गदर्शक, facilitator आहोत अशी भूमिका स्वागतार्ह आहे, ती वाटचाल योग्य दिशेने चालू आहे.


**करचुकवेगिरी हा मोठा विषय आहे. कायदे जितके सोपे असतील तेवढे चांगले असते. तुमचे पॅन कार्ड, आधार कार्ड, GST याद्वारे ३६० degree profiling करून ऑडिट ट्रेल निर्माण करता आला तर कर बुडविणे अवघड होऊ शकते. तुम्ही व्यवस्थेमध्ये पकडले जाण्याची शक्यता जास्त असेल तर कर बुडविण्याकडे तुमचा कल कमी राहतो. 'Minimum government and maximum governance' हे त्याचे उत्तर असू शकते आणि त्यासाठी योग्य दिशेने आपण जात आहोत. मी efficacy of tax breaks and exemption given to charitable trusts या विषयावर भरपूर काम केलेलं आहे. २००९ साली त्यामध्ये मी डॉ. अशोक जोशींच्या मार्गदर्शनाखाली Ph.D. केली. त्यामध्ये आम्ही आग्रहाने मांडले की कुठलेही टॅक्स ब्रेक्स तुम्ही दिले तर त्यातून गुंतागुंत, rent seeking behaviour, compliance cost आणि कर चुकविण्याची मानसिकता वाढते. कमी सवलत आणि कमी tax rate असे तुम्ही केले तर तुमचा tax जास्त गोळा होईल असे आमचे सांगणे होते. आम्ही केलेल्या काही सूचनांचे कायद्यात रूपांतर झाले ही फार अभिमानाची गोष्ट आहे. विशेष**

**उल्लेख cancellation of registration of a trust U/S 12A, survey of charitable trusts U/S 133A , annonymous donations u/s 115BBC, creation of national register of trusts या वरच्या सूचनांचा करायला हवा. चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असलेल्या करचुकवेगिरीला काही आळा घालू शकलो हे अल्पसे यश.**

आमचे काम पाहून सकाळ समूहाने सुचवल्याप्रमाणे आम्ही एक मराठी पुस्तिका लोकांसाठी तयार केली. त्याचे लेखन मी व S.K. Mishra यांनी केले. अनेक छोट्या चॅरिटेबल ट्रस्ट ना हे पुस्तक मार्गदर्शक ठरले. विशेष उल्लेख करायचा म्हणजे मी नागपुरला असताना महारोगी सेवा समिती, आनंदवनाचे अनेक refunds अडकून पडलेले होते. त्यात लक्ष घालून सगळी रचना नीट करायला मदत केली. त्यांचेच पैसे सरकार कडे अडकून पडले होते ते साधारण तीन कोटी रुपये आम्ही त्यांना रिफंड करू शकलो. त्या कामात मी उपयोगी पडू शकलो ही समाधानाची गोष्ट आहे.

**बासरी – माझी सखी**

खेळ, ट्रेकिंग, वाचन याच्या इतकेच संगीताचे विलक्षण आकर्षण होते. माझ्याकडे कॅसेट्स रेकॉर्डस, सीडी यांचा खूप मोठा संग्रह होता. खूप ऐकायचो. प्रबोधिनीत असताना आप्पा बासरी वाजवायचे हा ट्रिगर होताच. मी आ. गिंडे सरांकडे शिकायला जायचो पण गाडी फार पुढे सरकली नाही. मग कोल्हापूरला मी असताना मात्र २००३मध्ये माझे गुरुजी माझ्याकडे येऊन रहायचे. तिथे रोज रियाज करून-करून वादन सुधारायला लागले. २०१२मध्ये मी All India Radio ची Audition दिली आणि नागपूर आकाशवाणी केंद्रावरून B-High ही ग्रेड मला मिळाली. २०१५ ते २०१९ या दरम्यान माझे नागपूर आकाशवाणीवर १७ broadcast झाले. मी लहानपणापासून सराव केला असता तर कदाचित व्यावसायिक वादक झालो असतोही. मिलिंद दाते, रामदास पळसुले, समीर दुबळे यांनी जसे संगीतात करियर केले तसे करियर मला जमले नाही कारण नोकरी मधल्या वेळेच्या मर्यादा आणि ताणतणाव यामुळे मी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही. तरीही खूप ऐकल्यामुळे आणि चिकाटीमुळे छंदाच्या पुढे जाऊन B-High grade पर्यंत मजल मारली याचा अभिमान जरूर आहे. गुरूंचा आशीर्वाद आणि रियाज याचे हे फळ आहे. व्यावसायिक कामाचे ताणतणाव कमी करायला संगीत ही फार महत्त्वाची गोष्ट आहे याचा शोध लागत गेला. NADT मध्ये, US training मध्ये , IIM², बेंगलोर मध्ये अनेकदा असे झाले की ज्येष्ठ अधिकारी येऊन बसायचे आणि सांगायचे की 'राजीव कुछ बजाओ' नंतर जाताना सांगायचे 'तुमने कितना बोझ हलका कर दिया ये नही जानोगे' असे हृदयाला, अंत:करणाला भिडणारे वादन ही गुरूंची कृपा! तसेच लोकांशी जोडण्याचे संगीत हे फार मोठे माध्यम आहे. आपल्याकडे पद्य-लय-ताल-सूर प्रबोधिनीत त्यासाठी आहे. ही नादब्रह्माची उपासना आहे आणि तुम्ही कराल तेवढी कमी आहे. परवीन सुलतानाने सांगितले आहे, 'रियाज करोगे तो राज करोगे'. हे एक वैश्विक सत्य आहे. हे सर्व क्षेत्रात लागू आहे. मला निवृत्तीनंतरही रियाजाला वेळ मिळतो आहे. रियाज टिकवून ठेवायला लागतो. तुम्ही नियमित रियाज करायला पाहिजे. गेल्या जन्माची पुण्याई म्हणून भगवंतांनी या जन्मात बासरी हातात दिली आहे असे मला वाटते. It is never too late. तुमची इच्छा असेल तर तुम्ही कधीही आणि कोणाकडूनही शिकू शकता. प्रत्येक माणूस आणि परिस्थिती ही शिक्षक असते.



रजिस्टर्ड

प्रसार भारती
PRASAR BHARATI
भारतीय प्रसारण निगम
BROADCASTING CORPORATION OF INDIA
आकाशवाणी : नागपूर
ALL INDIA RADIO : NAGPUR

संख्या:नाग.3(1)/2012-पी ।। 2670 दिनांक : 27/11/2012

29 NOV 2012

श्री राजीव बळवंत रानडे
टी-6, तक्षशिला होस्टेल
एनएडीटी, छिंदवाडा रोड
नागपुर – 440 029

महोदय,

इस केन्द्र से शास्त्रीय संगीत में बासुरी वादन के लिए संगीत स्वर परीक्षण (एमएबी) के समक्ष भेजने हेतु की गयी आपकी रिकार्डींग के संदर्भ आपको सुचित करते हुए प्रसन्न्ता हो रही है कि, आपको सफल घोषित किया गया और आपको 'बी-हाय' श्रेणी प्रदान की गयी है ।

आप कृपया यह बात नोट कर लें कि हमारी आवश्यकता के अनुसार भविष्य में आपको इस केन्द्र से प्रसारण हेतु आमंत्रण भेजा जाएगा ।

आपके सहयोग के लिए धन्यवाद ।

भवदीय,
(बी. श्रीनिवास)
कार्यक्रम अधिकारी (संगीत)
कृते केन्द्र निदेशक











मी स्पर्धा परीक्षा केंद्राशी आजही संलग्न आहे. तिथे mock interviews साठी २००० सालापासून मी जात आहे. अनेक वर्षे How to prepare for the UPSC interview या माझ्या सत्राने सुरुवात झाली आहे. विवेक आणि सविताताई या दोघांनी हे काम उभे केले आहे. त्याबद्दल लिहाव तितकं थोडं आहे. ज्यांची मॉक टेस्ट घेतली असे सुमारे १००-१५० जण उच्चपदस्थ सरकारी अधिकारी म्हणून काम करत आहेत. या सर्वांचे मेंटर व्हायची संधी मिळाली हे मोठे भाग्य!! निवृत्तीनंतर स्पर्धा परीक्षा केंद्रात अधिक काम करण्याची इच्छा आहे. शिक्षण विभागात मिलिंद नाईक, मनोज देवळेकर दोघांशीही संपर्क आहे आणि काम करायला आवडेल. मात्र मध्यमवर्गीय मुलांच्या, ज्यांना कुठलेच प्रश्न नाहीत अशांच्या महत्त्वाकांक्षेला खतपाणी घालायला मी रक्त आटवण्यापेक्षा ज्यांच्याकडे काहीच नाही त्यांना जास्त कसे देता येईल असे सर्वसमावेशक काम करायला यापुढे आवडेल. Super30 सारख्या प्रयोगाचा मला अत्यंत मोह पडतो. हे करायची दिशा यशवंत मनोहरांनी 'उत्थान गुंफा' मध्ये सांगितली आहेच.


या मातीच्या कणाकणांच्या पायात आपण ज्वाळांचे चाल बांधू  
अंधाराच्या निर्घृण घृणेत विस्फोटक वादळांचे सजग पहारे पेरू आपण  
वैराण गळ्यांना आणि ओसाड डोळ्यांना आषाढमेघांसारखे दाटून आलेलं पाहू आपण  
आणि पेरून ठेवू येथील यातनांच्या ऐतिहासिक अरण्यात विक्राळ विजांचे शिस्तशीर काफिले !

विशेष उल्लेख भाईचा (भाई फडके) करायचा आहे. त्याशिवाय हे कथन पूर्ण होऊ शकणार नाही. आयुष्यात बरीच वर्षे अतिशय तणावाची होती. या काळात भाई आणि त्याच्या घरच्यांनी सावरून, सांभाळून व सामावून घेतले त्यामुळेच इथवर पोहोचू शकलो. हे न फेडता येण्यासारखे ऋण आहे !

**निवांत क्षणी**







# RAPID FIRE

१. आवडतं पुस्तक: रारंग ढांग, Into thin air आणि Mila 18

२. आवडता चित्रपट: a few good men आणि one flew over the cuckoo's nest

३. आवडता राग: यमन, नट भैरव

४. आवडता किल्ला: राजमाची

५. आवडतं शहर: कोल्हापूर

६. पहिली प्रतिक्रिया

- बासरी: राग अनुराग, स्वर ईश्वर
- पैसा: गरजे पुरता हवा.
- आप्पा पेंडसे: ज्यांच्यामुळे आम्ही घडलो
- ज्ञान प्रबोधिनी: बडी अजीब बंदिशे है इस मोहोबत्त की
  ना उन्होने कैदमे रखा ना हम फरार हो गये

७. पुन्हा आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?

– सैन्यात अधिकारी व्हायला आवडेल!

**राजीव रानडे**
**9423692730**
**rajeev855@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला व प्रशासकीय सेवा

## (UPSC व MPSC)




५१@५१ या लेखमालेत यापूर्वी कर्नल नंदकुमार कोरेगावकर यांच्या प्रवासात, प्रशालेच्या (पहिल्या दशकातील) संरक्षण दलात काम केलेल्या व करत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कामगिरीचा धावता आढावा घेतला होता. डॉ. राजीव रानडे व श्री. सुनील दाढे यांच्या लेखाच्या निमित्ताने भारतीय प्रशासकीय सेवेत कारकीर्द पूर्ण करणाऱ्या किंवा सध्याही शासकीय सेवेत असणाऱ्या आपल्या सर्वच मित्रांची नावे आठवणे हे आनंदाचे व अभिमानाचे आहे.


हेमंत जोगळेकर यांनी अनेक वर्षे भारतीय दूरसंचार सेवेत भारतभर अनेक ठिकाणी व भारत सरकारतर्फे परदेशातही देशाचे प्रतिनिधित्व केले. निवृत्तीनंतर गायत्री परिवार या संस्थेचे काम स्वयंसेवी वृत्तीने ते अनेक वर्षे करत आहेत. प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेत मोठ्या संख्येने गेले पाहिजे व तेथे 'कार्यकर्ता-अधिकारी' या वृत्तीने काम केले पाहिजे याची जागृती करून देण्याचे व त्याची पायवाट करून देण्याचे श्रेय अविनाश (अविदा) धर्माधिकारी यांना जाते. त्यांच्या IAS मधील यशाने महाराष्ट्रभर अनेकांना UPSC परीक्षेची तयारी करण्याची प्रेरणा मिळाली. मुदतपूर्व निवृत्तीनंतर 'चाणक्य-मंडळ' चे त्यांचे काम सर्वांनाच परिचित आहे. त्यांची पुस्तके, व्याख्यानमाला यामुळेही अविदांचे काम सर्वदूर पोचले आहे.

डॉ. वामन पारखी हे GST क्षेत्रातील आज आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. अठरा वर्षे त्यांनी भारत सरकारच्या सेवेत काम केले. SPG च्या राष्ट्रीय एकात्मता व सुरक्षा या गटात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. डॉ. यशवंत चव्हाण आयकर सेवेत पुण्यात महत्त्वाच्या पदावर आहेत. श्री. अतुलचंद्र कुलकर्णी पोलीस सेवेत असताना महाराष्ट्रात, अरुणाचल व दिल्ली येथे अनेक महत्त्वाच्या पदांवर कार्यरत होते. सध्या ते पुण्यात आहेत. राष्ट्रीय एकात्मता व सुरक्षा गटात त्यांचेही भक्कम योगदान आहे.


श्री. सुधीर बोबडे दिल्ली IIT तून उत्तीर्ण होऊन IAS म्हणून उत्तर प्रदेश राज्यात अनेक वर्षे आहेत. प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी कीर्ती शिर्के महाराष्ट्र सरकारच्या सेवेत आहेत.

समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीतून घडलेल्या युवक-युवतींनी नेतृत्व केले पाहिजे. शासकीय सेवा हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. असे उत्तरदायी व लोकाभिमुख प्रशासन असणे ही राष्ट्रीय आवश्यकता आहे. या बीजाचे 'स्पर्धा परीक्षा केन्द्र' या विभागाद्वारे जणूकाही नंतर मोठ्या वृक्षात रूपांतर झाले.

प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केन्द्रातर्फे गेल्या २५ वर्षांत सुमारे २००० अधिकारी महाराष्ट्र, देशभरात व परदेशातही कार्यरत आहेत. या विभागाची पायाभरणी व वाढ डॉ. विवेकराव कुलकर्णी व डॉ. सविताताई कुलकर्णी यांच्या अथक प्रयत्नातून झाली आहे.



HEMANT JOGLEKAR (1972)
Indian Telecom Service



SUNIL DADHE (1977)
Indian Audit & Accounts Service



VIVEK WADEKAR (1983)
Indian Revenue Service



NILESHKUMAR KSHIRSAGAR (1999)
Indian Administrative Service



AVINASH DHARMADHIKARI
(1972)
Indian Administrative Service



Dr. RAJEEV RANADE
(1976)
Indian Revenue Service



Dr. YASHWANT CHAVAN
(1980)
Indian Revenue Service




ATULCHANDRA KULKARNI
(1978)
Indian Police Service



RAHUL NANGARE
(1979)
Indian Revenue Service



NARENDRA NAIK
(1979)
MPSC Maha Gov.



Dr. WAMAN PARKHI (1982)
Indian Customs & Excise Service




SUDHIR BOBDE (1981)
Indian Administrative Service



KIRTI SHIRKE (1991)
MPSC Maha Gov.




KETAN SALUNKHE (2004)
Central Armed Police Forces



PRATAP JAGTAP (2006)
Revenue and Forest Department



SOURABH PAWAR (2008)
Geological Survey of India,
Ministry of Mines